**सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कोयना प्रकल्पामुळे पुनर्वसित गावठाणांतील नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांक: पुनर्व-२०२४/प्र.क्र. ३१/पुनर्वसन-६(र-८)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०८ मे, २०२६

वाचा-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.पुनर्व-२०२४/प्र.क्र.३१/र-८, दि.०९.०९.२०२४
२) जिल्हाधिकारी, सातारा यांचे कार्यालयाचे पत्र क्र.पुनर्व/स.व्या.प्र./Comp no-२७०३०८११/२०२६, दि.२४.०३.२०२६

**प्रस्तावना -**

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कोयना प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावठाणांतील पुढील तक्त्यात नमूद नागरी सुविधा कामांच्या एकूण रूपये ५,५०,००,०००/- (अक्षरी रूपये पाच कोटी पन्नास लक्ष फक्त) रकमेच्या अंदाजपत्रकांना वाचा क्र.१ येथील नमूद शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश तसेच त्या अनुषंगिक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणा बदलून देण्याबाबतची विनंती वाचा क्र.२ येथील नमूद पत्रान्वये शासनास करण्यात आली असून त्यानुसार सदर शासन निर्णयात दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धिपत्रक -**

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कोयना प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावठाणांतील नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबतच्या वाचा क्र.१ येथे नमूद शासन निर्णयातील निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश तसेच त्या अनुषंगिक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणा म्हणून घोषित केलेल्या “कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण), सातारा जिल्हा परिषद” ऐवजी “कार्यकारी अभियंता,धोम कालवे विभाग क्र.२,सातारा ”असे वाचण्यात यावे.

२. वाचा क्र.१ येथील शासन निर्णयातील नमूद अटी व शर्ती लागू राहतील.

३. सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५०८१२४८५७३११९ असा आहे. हे शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAV ASHOK
BANTEWAD

Digitally signed by MADHAV ASHOK BANTEWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0d181aa39b4d21e44d471606b7df670cbc65b3cb8d80b1ca27929265161d139a,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1B720BC879C4DDAC69D0E7FC911BFC2A93205010890D544AFB10419754DA25
25, cn=MADHAV ASHOK BANTEWAD
Date: 2026.05.08 12:49:54 +05'30'

**( माधव अ.बंटेवाड )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन) पुणे विभाग, पुणे.
२. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, सातारा

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
४. उप आयुक्त (पुनर्वसन), पुणे.
५. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण), सातारा जिल्हा परिषद
६. कार्यकारी अभियंता, धोम कालवे विभाग क्र.२, सातारा
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
८. महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र राज्य,मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा
१०. जलसंपदा विभाग/मोप्र-२. मंत्रालय, मुंबई.
११. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), सातारा
१२. वित्त विभाग,कार्यासन व्यय-१० व अर्थसंकल्प-३, मंत्रालय, मुंबई.
१३. नियोजन विभाग,कार्यासन १४७५, मंत्रालय, मुंबई.
१४. महसूल व वन विभाग,कक्ष अधिकारी ब-१,पी.ए.सी. कार्यासन, मंत्रालय,मुंबई.
१५. निवड नस्ती कार्यासन र-८,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.